## थोडक्यात



मिरज : अर्धमागधी अभ्यासक्रम कार्यशाळेत बोलताना डॉ. प्रकाश दुकळे.

# अर्धमागधीच्या सुधारित अभ्यासक्रमाचा सखोल अभ्यास आवश्यक : प्रा. दुकळे

**मिरज :** येथील यशवंत शिक्षण संस्थेच्या लोकनेते प्रा. शरद पाटील महाविद्यालयातील अर्धमागधी विभागाच्यावतीने आणि शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या सहकार्याने बी.ए.भाग३ अर्धमागधी सुधारित अभ्यासक्रमावर आधारित एकदिवसीय कार्यशाळा उत्साहात झाली. प्रारंभी अर्धमागधी विषयाच्या विशेष भित्तीपत्रिकेचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यशाळेत चिखली येथील देशभक्त आनंदराव बाळवंतराव नाईक कला व विज्ञान महाविद्यालयाचे मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. प्रकाश दुकळे यांनी बीजभाषक म्हणून मार्गदर्शन केले. अर्धमागधी ही भारतीय ज्ञानपरंपरा, भाषा आणि साहित्याच्या अभ्यासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची भाषा आहे. त्यामुळे प्राध्यापकांनी सुधारित अभ्यासक्रमाचा सखोल अभ्यास करून विद्यार्थ्यांना आधुनिक व प्रभावी पद्धतीने मार्गदर्शन करणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन डॉ. दुकळे यांनी आपल्या भाषणात केले. अध्यक्षीय मनोगतात महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ. एस. बी. गायकवाड यांनी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील आवश्यक बदलांवर सविस्तर चर्चा केली. विविध तांत्रिक सत्रांमध्ये डॉ. महावीर पाटील, राहुल उपाध्ये, प्रा. डॉ. महावीर शास्त्री आणि प्रा. डॉ. बी. डी. गन–पाटील यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी सुधारित अभ्यासक्रमाची रचना, अध्यापन पद्धती आणि विद्यार्थ्यांच्या अध्ययनाच्या दृष्टीने महत्त्वाच्या घटकांवर सविस्तर माहिती दिली. नियोजन प्रा. स्वाती पाटील व प्रा. शिल्पा सूर्यवंशी यांनी केले. सत्रांच्या अखेरीस आयोजित खुल्या चर्चासत्रात उपस्थित शिक्षक व विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमाबाबत विविध प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले. या कार्यशाळेमुळे प्राध्यापक व विद्यार्थ्यांना नवीन अभ्यासक्रमाविषयी स्पष्टता व उपयुक्त दिशा मिळाली.